# नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय,नवीन मुख्यालय, ३ रा मजला, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक ११/०८/२०१४.**

नवी मुंबई महानगरपालिकेची ऑगस्ट महिन्याची दुसरी सर्वसाधारण सभा, मंगळवार, दिनांक १९ ऑगस्ट २०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता बेलापूर, भुखंड क्रमांक ०१, सेक्टर १५ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील ५ व्या मजल्यावरील राजमाता जिजाऊ सभागृह येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

१. प्रश्नोत्तरे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

२. **नमुंमपाच्या** आस्थापनेवर सफाई कामगार या पदावर लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारसा हक्क पध्दतीच्या अमंलबजावणीच्या अनुषंगाने विशेष बाब म्हणून कायमस्वरुपी नेमणूक करणेबाबत.

३. नेरुळ से.५ येथील महाशनिद्वार ते रिलायन्स फ्रेश पर्यंतच्या रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे.

४. तुर्भे क्षेपणभूमी येथील IV सेल MSW(M&H) Rule-२००० प्रमाणे शास्त्रोक्त पध्दतीने बंद करणे.

५. वाशी सेक्टर १५ येथील विविध ठिकाणी पदपथांची सुधारणा करणे.

६. वाशी सेक्टर १२ मधील उर्वरीत पदपथांची सुधारणा करणे.

**ठरावाच्या सूचना :**

**७ व ८. श्री. मनोज गोपीनाथ हळदणकर, यांजकडून :-**

(७) प्र. क्र. ११, ऐरोली येथील अग्नीशमन दलाची कर्मचारी वसाहत ही सिडको निर्मित वसाहत असून या वसाहतीमधील इमारती जिर्ण झालेल्या आहेत. या इमारतीची दुरावस्था झाली असल्याकारणाने नव्याने बांधणे. (८) प्र. क्र. ११, ऐरोली येथील महिला बचत गटांना चालना मिळण्याकरिता त्यांच्या हक्काचं व्यासपिठ उपलब्ध करण्याकरिता महिला सक्षमीकरण केंद्र बांधणे.

**९ व १०. श्री. बहादुर त्रिलोक सिंह बिस्ट, यांजकडून :-**

(९) प्र.क्र. ५ मधील पावसाळी पाणी व स्थानिक घराचे पाणी वाहून नेणारा मोठया नाल्यावर (वाशी मधील नाल्यावर बांधण्यात आलेले स्लॅबच्या धर्तीवर) स्लॅब बांधणे. (१०) प्र.क्र. ५ मधील दोन्ही बांजूनी डोंगर भाग आहे. सदर डोंगर भागात रहीवासी वस्ती आहे श्रीराम चाळ, इलठणपाडा, प्रबोधकार विद्यालय व लालबहादूर शास्त्री विद्यालय समोरील भागात व कन्हैयानगर भागात पावसाळी दरड कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर ठिकाणी संरक्षण भिंत बांधणे.

**११ व १२. श्री. जगदिश नाना गवते, यांजकडून :-**

(११) प्र. क्र. ०२ मध्ये ठाणे-बेलापूर मुख्य रस्त्यावर मुकुंद पोलिस चौकी समोर व गणपती पाडा येथे स्पीड ब्रेकर (गतिरोधक) बसविणे.

(१२) महाराष्ट्र शासनाने पात्र केलेल्या ०१ जानेवारी २००० पर्यंतच्या घरांना घरगुती (स्वतंत्र) नळ कनेक्शन देणे.

**१३ व १४. सौ. रेखा विनोद म्हात्रे, यांजकडून :-**

(१३) प्र. क्र. ८९ करावे गावाच्या पश्चिमेकडील समुद्रकिनारी असलेली स्थानिकांची सिडकोने भुसंपादनातुन वगळण्यात आलेली जमिन नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत मोडते. त्यामुळे नुकताच महाराष्ट्र शासनाने पारित केलेल्या अकृषिक धोरणाच्या अनुषंगाने सदर अकृषिक घोषित करणे. (१४) प्र. क्र. ८९ करावे गावातील श्री गणेश तलाव येथे असणा-या श्री. गणेश मंदिरापर्यंत नवीन पदपथ तयार करणे.

**१५. श्री. सुरेश गोपाळ शेट्टी, यांजकडून :-**

परवाना विभागाकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१३ व ३७६ अन्वये परवाना/परवानगी देण्यात येतात. परंतू सदर परवाना /परवानगी वित्तवर्षानुसार केवळ १ वर्षाकरीता नुतनीकरण करण्यात येते. त्यामुळे संबधित परवाना/परवानगी धारकांस दर वेळी नागरीकांची सनद पुस्तिकेत निर्देशित केलेल्या कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. तद्नंतरच संबधितांचा परवाना/परवानगी नुतनीकरण केले जाते व कागदपत्रांची पुर्तता करणेस विलंब होत असल्याने विहीत वेळेत परवाना परवानगीचे नुतनीकरण होत नाही. तरी या अनुषंगाने मनपाने तयार केलेल्या उपविधीत/नियमावलीत बदल करणे.

**१६ व १७. सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**

(१६) प्र. क्र. २१, अंतर्गत तळवलीगांव तुकाराम पाटील चौक मराठी शाळेजवळील जूने मोडकळीस आलेले विना वापराचे शौचालय तोडून तेथे बहुउद्देशिय इमारत बांधणे, त्याठिकाणी महिला मंडळासाठी हॉल बांधणे तसेच वाचनालय बांधणे. (१७) प्र. क्र. २१, अंतर्गत तळवलीगांव येथील गावदेवीवाडी येथील जिल्हा परिषद कालीन मोळकळीस आलेली व्यायामशाळा तोडून त्याठिकाणी पार्कींगसह अद्यावत व्यायामशाळा बांधणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक ११ ऑगस्ट २०१४.**